# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे**
**कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक- २११** **दिनांक १३/०७/२०२२**

## मोटारसायकल चोरी करणा-या सराईत आरोपीतांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिन्यांपासून स्कुटर मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. सदर घटनांची वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभिर्याने दखल घेवुन सदर प्रकारच्या गुन्हयांना प्रतिबंध करुन आरोपीतांचा शोध घेण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस पथकातील पोलीस अधिकारी अंमलदार यांनी आरोपीतांबाबत तांत्रीक पुरावे हस्तगत करुन मिळालेलया गुप्त माहितीच्या आधारे संशईत नामे- १) आमिर अब्दुल वाहीद कुरेशी वय २६ वर्षे, रा. रुम नंबर १०३, ए विंग, आदिराज अपार्टमेंट, साई नगर, नालासोपारा पश्चिम, ता. वसई जि. पालघर. २) मोहम्मद अरशद जलालुद्दीन अंन्सारी वय - २६ वर्षे, रा. रुम नंबर ६०१, डांगे कॉम्पलेक्स बिल्डींग नंबर ०२, सिक्रेट हार्ट स्कुल जवळ, नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे कौशल्यपुर्वक तपास करता त्यांचा खालील गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे | ६३७ / २०२२ | भा.द.वि.कलम ३७९, ३४ प्रमाणे |
| २ | अर्नाळा सागरी पोलीस ठाणे | २१८ /२०२२ | भा.द.वि.कलम ३७९, ३४ प्रमाणे |
| ३ | नालासोपारा पोलीस ठाणे | २५२ / २०२२ | भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | नयानगर पोलीस ठाणे | ४३७ / २०२२ | भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे |
| ५ | नारपोली पोलीस ठाणे (ठाणे शहर) | ३१२ / २०२२ | भा.द.वि. कलम ३७९ प्रमाणे |

उपरोक्त आरोपीत यांना विरार पोलीस ठाणे कडील गुन्हा रजि नंबर ६३७/२०२२ भा.दं.वि.कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हयात अटक करण्यात आली असुन गुन्हयाचे तपासादरम्यान त्यांचेकडुन गुन्हयातील २,९६,०००/- रु किंमतीच्या ५ मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष -३ कडुन करण्यात येत असुन अटक आरोपीत यांना दिनांक ११/०७/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर आहे.

वरील कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय) अति कार्य. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश

भागवत, पो.हवा/ सचिन घेरे, मुकेश तटकरे, सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश पवार, अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.



---ooo---